## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(सकाळ)**

जा.क्र. ६८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/१०/२०१७

**१) बॅगमधुन नगदी पैसे, व हात घडयाळ व पेन ड्राईव चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०३/१०/२०१७ चे ११.०० ते ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कु. लेखा दिंगाबर गेडाम वय ३३ वर्ष, रा. राजस्व कॉलोनी गणेशपुर भंडारा हिने आपले स्वत:ची बॅग पंचायत समिती पशुधन पर्यवेक्षन ऑफीसच्या कपाटात ठेवुन बाथरुम कडे गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने ऑफीस मध्ये प्रवेश करुन कपाट उघडुन बॅग मध्ये ठेवलेले दुधाळ गायी खरेदीची शासकीय योजने अंतर्गत लाभार्थ्या कडुन घेतलेले नगदी २१,०००/—रु., हात घडयाळ, पेन ड्राईव असा एकुण २२,२५०/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) जागेच्या वादावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन महिलेचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०२/१०/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे घरा समोरील अंगणात येवुन फिर्यादी व तीचे पती सोबत पानठेल्याच्या जागेच्या कारणा वरुन वादा घालु लागले व त्यांचे ओरडण्यामुळे तेथे सर्व जमलेल्या लोकांसमोर आरोपीने अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फिर्यादीकडे बघुन आपले पॅन्ट खाली करुन अश्लिल हातवारे करुन जिवाने मारण्याची धमकी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४४७,३५४(अ)(१),४,२९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरखडे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे २२.०० वाजता ते ०२/१०/२०१७ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरा समोर ऊभी असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरासमोरील रोडवर जावुन दुर्गा उत्सव मंडळाचे हिसोब बरोबर दिले नाही असे म्हणुन शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ५०९,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरखडे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**४) घरात अनाधिकृतपणे प्रवेश करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/१०/२०१७ चे २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी रात्री जेवन करुन आपले मुलासह झोपली असता यातील आरोपीने फिर्यादीचा पती तिचे घरी नसल्याचे पाहुन फिर्यादीच्या घरात अनाधिकृतपणे प्रवेश करुन फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या हेतुने ती झोपलेल्या पलगांवर जावुन बसला व फिर्यादीचे अंगाला हात लावत असतानीच फिर्यादी किंचाळत ओरडल्याने यातील आरोपी पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४८,३५४(ड)(१) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

५) **अवैध दारू अडयावर धाडी . :–**

दिनांक ०३/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, करडी, लाखणी व अडयाळ येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०५गुन्हे दाखल करून ९४ लिटर हा.भ. दारू + १ मोटार सायकल किंमती २२,९००/–रु, चा माल जप्त करण्यात आला.

६) **मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती ११ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८२ केसेस करण्यात आले आहे.

(पोनी. एम.एम. सिडाम)
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र. ९८३४४५८९२८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.